# प्रकरण चौथे

# सारांश आणि निष्कर्ष

# प्रकरण ४ थे

# सारांश आणि निष्कर्ष

## ( Summary and Conclusions )

सहकारी दूध संस्था आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे, संशोधन अहवालाची विभागणी चार प्रकरणात केली आहे.

## प्रकरण १ ले : कोल्हापूर जिल्हयातील दूध संस्थाचा विकास :

लघुशोध प्रबंधाच्या या पहिल्या प्रकरणात दोन विभाग आहेत. पहिल्या विभागात कोल्हापूर जिल्हयातील सहकारी दूध संस्थाच्या विकासाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. दुस–या विभागात प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या दोन महिला सहकारी संस्थाचा थोडक्यात परिचय करून दिला आहे.

१) शिनोळी (खुर्द) , श्री जयभवानी महिला सहकारी दूध संस्था मर्यादित, शिनोळी खुर्द, ता. चंदगड जि.कोल्हापूर के.पी. आर./सी.जी.डी/ए.जी.आर(ओ) १५५२(डी) कोड नं. १८७४.९६ दि २६.११.१९९६

२) मजरे कार्वे येथील श्री बाळकृष्ण महिला सहकारी दूध संस्था मर्यादित, मजरे कार्वे, ता. चंदगड, जि.कोल्हापूर, नोंदणी कमांक के.पी. आर./सी.जी.डी/ए.जी. आर(ओ) २०१९(डी) ९९–२००० दि २६.११.१९९६

## प्रकरण २ रे : संकल्पनात्मक संदर्भ चौकट आणि पध्दतीशास्त्र

प्रस्तुत प्रकरणात, सदर अभ्यासाची संकल्पनात्मक संदर्भ चौकट अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पध्दतीचे विवेचन करण्यात आले आहे. या प्रकरणात तीन प्रमुख विभाग आहेत पहिल्या विभागात 'स्त्रियांचे सबलीकरण ही संकल्पना स्पष्ट करण्यात आली आहे. दूस–या भागात समर्पक उपलब्ध संशोधन सहित्याचे परिशीलन करून त्यांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. तिस–या भागात, अभ्यास पध्दती विषयीचे तपशीलवार विवेचन केले आहे.

## ४.१ संशोधन समस्या :-

"सहकारी दूध संस्था आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण" असा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. सहकारी दूध संस्थामूळे ग्रामीण महिलांचे सबलीकरण (समक्षीकरण) घडून येत आहे काय हे अभ्यासणे ही सदर अभ्यासाची समस्या आहे.

## ४.२ संशोधनाची उदिद्ष्टे

ग्रामीण महिलांच्या सबलीकरणातील व सहकारी महिला दूध संस्थाची भूमिका समजून घेणे हे प्रस्तुत संशोधनाचे सर्वसाधारण उदिद्ष्ट आहे.

या संशोधनाची विशिष्ठ उदिद्ष्टे खालील प्रमाणे आहेत.

१) निवडक सहकारी महिला दूध संस्थाचा परिचय करून घेणे.

२) सहकारी महिला दूध संस्थेतील संचालक आणि सभासद महिलांच्या सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

३) ग्रामीण महिलांच्या सबलीकरणामधील सहकारी महिला दूध संस्थाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

## ४.३ संशोधन क्षेत्र

सदरचे संशोधन करण्यासाठी कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुक्यातील मजरेकार्वे व शिनोळी (खुर्द) या दोन गांवांची निवड केली त्याची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१) चंदगड तालुक्यात विविध सहकारी संस्थाचे जाळे विणले गेले असून तालुक्यात अनेक गावात महिलांच्या सहकारी संस्था कार्यरत आहेत. त्यामुळे अभ्यासासाठी अशा दोन संस्थांची निवड करणे संशोधिकेला सोयीचे होते.

२) संशोधिका ही चंदगड तालुक्यातील मु.पो. डुक्करवाडी या गावची कायमची रहिवाशी असल्यामुळे अभ्यास क्षेत्रासाठी निवडलेल्या संपूर्ण परिसराची चांगली

माहिती आहे. तसेच येथील सामाजिक संपर्कामूळे उत्तरदात्यांकडून संशोधनासाठी उपयुक्त माहिती संकलित करणे सोयीचे होते.

वरील बाबी ध्यानात घेऊन चंदगड तालुका हे अभ्यास क्षेत्र निवडण्यात आले.

## ४.४ संशोधनासाठी संस्थाची निवड

संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती पुरविण्याबाबतचे संस्थेचे व सभासदांचे अपेक्षित सहकार्य लाभण्याची शक्यता आणि संशोधिकेची सोय या दोन निकषांच्या आधारे खालील दोन सस्थांची निवड करण्यात आली.

१) शिनोळी (खुर्द) , श्री जयभवानी महिला सहकारी दूध संस्था मर्यादित, शिनोळी खुर्द, ता. चंदगड जि.कोल्हापूर के.पी. आर./सी.जी.डी/ए.जी.आर(ओ) १५५२(डी) कोड नं. १८७४.९६ दि २६.११.१९९६

२) मजरे कार्वे येथील श्री बाळकृंष्ण महिला दूध सहकारी संस्था मर्यादित, मजरे कार्वे, ता. चंदगड, जि.कोल्हापूर, नोंदणी कमांक के.पी. आर./सी.जी.डी/ए.जी. आर(ओ) २०१९(डी) ९९–२००० दि २६.११.१९९६

## ४.५ नमुना निवड

संशोधिकेजवळ उपलब्ध असणारी उदा. श्रम,वेळ, आणि पैसा या स्वरूपातील साधन सामग्री लक्षात घेऊन दोन संस्थामधील ४५ महिला उत्तरदात्यांची निवड हेतूनिष्ठ नमूना निवड ( Purposive Sampling Technique ) या तंत्राचा अवलंब करून केली.

## ४.६ तथ्य संकलनाचे साधन :

अभ्यासासाठीची उदिद्ष्टये लक्षात घेऊन तथ्यसंकलन करण्यासाठी एक मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली वरीलपैकी दोन्ही संस्थेतील पाच पाच सभासदांची मुलाखत घेऊन अनुसूचीची पूर्वचाचणी घेण्यात आली. योग्य त्या दुरूस्त्या

करून मुलाखत अनुसूचित काही बदल करण्यात आले आणि अंतिम मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली.

## ४.७ तथ्य संकलन :

संधोधनासाठी निवडलेल्या नमुन्यातील महिला संदस्यांकडून सदर मुलाखत अनूसूचिच्या सहाय्याने संशोधिकेने स्वतः मुलाखती घेऊन माहिती संकलित केलेली आहे. तथ्य संकलनाचे काम १ नोव्हेंबर २००२ ते ३० नोव्हेंबर २००२ या कालावधीत करण्यात आले.

## ४.८ संकलीत माहितीचे वर्गीकरण

संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण करून सारण्या तयार करण्यात आल्या. सदर सारणीतील वर्गीकृत माहितीच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात आले.

**प्रकरण ३ रे : सहकारी दूध संस्था आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण**

"सहकारी दूध संस्था आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण" या तिस-या प्रकरणात निवडलेल्या नमुन्यातील ४५ महिला उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संकलीत केलेल्या महितीच्या आधारे सहकारी दूध संस्था ग्रामीण महिलांच्या सबलीकरणात कोणती भूमिका पार पाडतात हे समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या प्रकरणात तीन स्थूल विभाग करण्यात आलेले आहेत.पहिल्या विभागात उत्तरदात्यांच्या समाजिक –आर्थिक पार्श्वभूमीचे वर्णन केलेले आहे. दूस–या विभागात उत्तर दात्यांच्या दुग्ध व्यवसायातील सहभागाबदद्लचे विवेचन आहे. तर तिस–या विभागात सहकारी दूध संस्थातील सहभाग आणि त्यामुळे उत्तरदात्यांवर पडलेला प्रभाव या संबधीच्या उत्तरदात्यांच्या प्रतिक्रियांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

## ४.९ प्रस्तुत संशोधनातील प्रमुख निष्कर्ष खालील प्रमाणे :

या प्रकरणातील सहकारी दूध संस्थामधील महिलांच्या सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी विषयीच्या महितीवरून असे दिसून येते की, सहकारी दूध संस्थाचे सभासद

असणा-या महिलांमध्ये ३६ ते ५० वयोगटातील महिलांचे प्रमाण सर्वात अधिक (३७.७७% ) आहे. तर ५१ ते ६० वर्षे या गटातील सर्वात कमी (१३.३३%) आहे. तरूण आणि वृध्द स्त्रियांच्या तूलनेत परिपक्व आणि प्रौढ वयोगटातील ३६ ते ५० स्त्रियांना सहकारी दूध संस्थाचे सभासदत्व देण्याकडे कल आहे. असे दिसून येते.

शैक्षणिक पात्रतेचा विचार करता सहकारी दूध संस्थामध्ये अगदी अशिक्षित स्त्रियांपासून ते पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या महिला सभासद आहेत. यामध्ये बहूसंख्य उत्तरदात्या महिला ३६ ते ५० वयोगटतील आहेत. या पार्श्वभूमीवर उत्तरदात्या महिलांमध्ये अशिक्षित महिलांचे प्रमाण आधिक असणे फारसे आश्चर्यकारक नाही.

अभ्यासासाठी निवडलेल्या ४५ स्त्रियांपैकी (९५.५६%:) स्त्रिया विवाहित तर उर्वरित २ (४.४४%) स्त्रिया या विधवा होत्या. निवडलेल्या नमुन्यात सहकारी दूध संस्थेची सभासद असणारी एक ही अविवाहित महिला नव्हती, ही उल्लेखनीय बाब आहे. अविवाहित मुलगी परक्याचे धन अशी ग्रामीण भागातील समाजाची धारणा आहे त्यामूळे तिच्या नांवावर संस्थेचे समभाग शेअर्स कोणीही विकत घेत नाही. कायमस्वरूपी राहील अशी कौटूंबिक संपत्ती अविवाहित स्त्रिंच्या नांवे करणे आणि सामाजिक सहभागाला स्वातंत्र्य देणे या बाबीकडे ग्रामीण समाजात अजुनही कल दिसून येत नाही हे यावरून सूचित होते.

बहूसंख्य उत्तरदाते (७७.७७%) हे विभक्त कुटूंबातील आहेत. तर उर्वरित २२.७३% उत्तरदाते हे संयूक्त कुटूंबातील आहेत. यावरून विभक्त कुटूबातील पध्दती स्त्रियांच्या उन्नतीकरिता अधिक पोषक ठरत असल्याचे दिसून येते. विभक्त कुटूंबाचे व त्यात सहभागी होण्यास त्यांच्या पुरूष साथीदांराकडून स्वातंत्र्य मिळत असल्याचे ही प्रस्तुत आकडेवारीवरून सुचित हाते.

कुटूंबाच्या आकारमानुसारच्या माहितील ५७.७८% उत्तरदाते ५ पर्यत सदस्य संख्या असणारे लहान आकाराच्या कुटूंबातील आहेत. तर ६ ते १० पर्यत संख्या असणा-या मध्यम आकाराच्या कुटूंबात २६.४७% उत्तरदाते आहेत ११ हून अधिक

सदस्य संख्या असणारे प्रमाण १५.४५ % आहे. उत्तरदात्यांमध्ये विभक्त कुटूंबाची पार्श्वभूमी लाभलेली असल्याने लहान आकाराच्या कुटूंबाची पार्श्वभूमी उत्तरदात्यांना असणे ही बाब फारशी आश्चर्यकारक नाही. तरी देखील एक लक्षणीय बाब म्हणजे ग्रामीण कुटूंबाचा आकार मर्यादित होत चालल्याचा सर्वसाधारण निष्कर्ष वरील माहितीवरून काढता येईल.

उत्तरदात्यांमध्ये जातीच्या महितीवरून मराठा जातीच्या स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक (९३.४४%) आहे त्यानंतर अनुक्रमे महार, बेरड व परीट यांचे अनुक्रमे प्रमाण (२.२२%) आहे. एकंदर महाराष्ट्रात तसेच चंदगड तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील लोकसंख्येत मराठा जातीच्या सदस्यांची संख्या सापेक्षतः अधिक आहे. सहकारी दूध संस्थाच्या व इतर सहकारी क्षेत्राच्या उभारणीमधील सदस्यांमध्ये देखील मराठा जातीच्या सदस्यांचे प्राबल्य दिसून येते. या पार्श्वभूमीवर उत्तरदात्यांमधील मराठा जातीच्या सदस्याचेच प्रमाण अधिक असणे फारसे आश्चर्यकारक नाही पण मिळवपलेल्या माहितीवरून दिसून येणारी ठळक बाब म्हणजे सहकारी दूध संस्थेत जरी मराठा समाजातील महिलांचे प्राब्ल्य असले तरी विषम प्रमाणात असणा-या इतर जातीच्या स्त्रियांनाही दूध संस्थाचे सभासद करून घेतले आहे. या वरून असे दिसून येते की सहकारी दूध संस्था जाती जातीतील बंधने झुगारून देणा-या संस्थाा आहेत. सहकारी दुधसंस्थेच्या माध्यमातून विवधि जातीच्या स्त्रियांना गावपातळीवर एकत्र काम करण्याची व परस्परांशी प्रभावी आंतरक्रिया करण्याची संधी मिळत असल्याने पारंपरिक जातीय पूर्वग्रह कमी होऊन जाती जातीमधील उच्च निचता कमी होऊन आपआपसात सलोख्याचे सौहार्दाचे वातावरण निर्माण होण्यास चालना मिळते आहे. जवळ जवळ ३/४ उत्तरदात्याचे पती साक्षर आहेत २४.४४% उत्तरदात्यांचे पती निरक्षर आहेत. बहूसंख्य (६६.६७ % ) उत्तरदात्यांच्या पतीचा व्यवसाय हा शेती असून २९ % उत्तरदात्यांचे पती नोकरी करतात यावरून असे दिसून येते की पती शिकलेले असतील तर स्त्रियांना कुटुबाबाहेरील सहकारासारख्या क्षेत्रात सहभागी होण्याची संधी अधिक प्रमाणात होण्याची शक्यता असते हे यावरून सूचित होते.

जमीन मालकी क्षेत्रानुसार उत्तरदात्यांचे वर्गीकरण केले असता बहूसंख्य (४४.४५ टक्के) उत्तरदात्या महिलांचे कुटूंब सिमांत शेतकरी गटातील आहेत. यानंतर लहान शेतकरी २.५ ते ५ एकरपर्यत जमीन असणारे २२.२३ टक्के व ८ एकरहून अधिक जमीन असणारे ८.८८ टक्के आहेत तर भूमीहिन शेतकरी १५.५५ टक्के आढळून आले. स्वतःच्या मालकीची जमीन नसणारेही आहेत त्यांना शेतमजूर म्हणून काम करण्याशिवाय पर्याय नाही, शेत जमीन असणा-यांनी दूध व्यवसाय दुय्यम व्यवसाय म्हणून स्विकारला आहे पण शेतमजूरी करणा-या कुटूंबानीही या व्यवसायाचा आधार घेतला आहे. हे यावरून स्पष्ट हाते.

बहूसंख्य उत्तरदाते २०,००० रू पर्यत सरासरी वार्षिक उत्पन्न गटातील आहेत त्या खालोखाल २०,००१ ते ५०,००० पर्यत (२६.४५ टक्के व ५०,००१ ते १,००,००० पर्यत (१५.५५%) तर १,००,००१ हून अधिक उत्पन्न असणारे (१३.३४% ) उत्तरदाते आहेत. जवळ जवळ (७०%) उत्तरदात्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न रू ५०,००० पर्यंत आहे दुग्ध व्यवसायामुळे या कुटूंबाना आपले कौटूंबीक उत्पन्न वाढविण्यास मदत होत असली पाहिजे.

कौटुंबिक मालकीच्या दुभत्या जनावरांच्या संख्येनुसार २ पर्यत दुभती जनावरे असणारे ३२ (७१.१२%) महिला उत्तरदात्या आहेत. त्यानंतर अनुक्रमे ३ ते ५ पर्यत (२०%) तर सध्या दुभती जनावरे असणारे (८.८८%) उत्तरदात्यांचे प्रमाण आहे. सरासरी १२ रूपर्यत ते १६ रू पर्यंत या दरम्यान बहुतांशी उत्तरदात्यांना प्रतिलिटर दुधाचा दर त्यातील फॅट स्निग्धाशा प्रमाणे मिळतो. दुंधापासून १ महिन्याला सरारसी उत्पन्न खालीलप्रमाणे महिला उत्तरदात्यांना मिळते महिना १,००० रू ते २,००० पर्यत ३५.५६% उत्तरदात्यांना दूधापासूनची प्राप्ती होते. २,००१ ते रू ३,००० रू पर्यत घेणारे ही ३५.५६% उत्तरदाते आहेत. सरासरी १ ते ३ हजार पर्यतच्या गटातील ७१% उत्तरदात्यांचे प्रमाण आढहून आले रू ४००० ते ६००० रू पर्यत दुधापासूनचे उत्पन्न ६. ६६%` प्रामण आढळून आले तर ६००१ पेक्षा अधिक उत्पन्न घेणारे २.२२% प्रामाण आहे तर संध्या दूध दुभती जनावरे नसल्याकरणाने सध्या दूध न पुरवणा-याचे प्रमाण ८.८८%

आहे. या वरून असे म्हणता येईल की रोखीने हमखास उत्पन्न देणारा एक दुय्यम व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय ग्रामीण भागातील लोकांना त्यांचे जीवनमान उंचावण्यास निश्चितच मदत करणारा आहे.

सहकारी दूध संस्थेत संचालक असणा–या महिला संदस्यांची आर्थिक–सामाजिक पार्श्वभूमी स्वतंत्रपणे अभ्यासली आहे, जात, वय, शिक्षण, कौटूंबिक पार्श्वभूमी आणि कौटूंबिक उत्पन्न या निवडक परिवर्त्यासंदर्भातील माहितीचे स्वतंत्रपणे विश्लेषण केले आहे त्यावरून असे दिसून येते की, संचालक मंडळात प्रतिनिधित्व करणा–या महिला या मराठा जातीतील जास्त प्रमाणात आहेत तर बहुतांशी स्त्रिया सुशिक्षित, मध्यमवयीन व विभक्त कुटूंबातील व मध्यम उत्पन्न गटातील आहेत. संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक क्वचितच घेतली जाते अन्यथा सर्वानुमते विचार विनिमय होऊन संचालक मंडळ सर्वसंमतीने निवडले जाते असे प्रत्यक्ष निरिक्षणावरून दिसून आले की दूध संस्था स्थापन करण्यासाठी पुढाकार घेणा–या पुरूष व्यक्तींच्या कुटूंबातील किंवा नात्यातील महिलांची सदर संस्थेच्या संचालकपदी निवड केली जाते.

३ –या प्रकरणातील दुस–या विभागामध्ये उत्तरदात्यांचा दुग्ध व्यवसाय आणि सहकारी संस्थेतील सहभाग या विषयीचे विवेचन आहे

दुभत्या जनावरांची देखभाल आपण स्वतः करता काय ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारण्यात आला तेंव्हा सर्वच उत्तरदात्यांनी असे सांगितले की दुभत्या जनावराची देखभाल आम्ही स्वतः करतो. प्रसंगी घरातील इतर व्यक्तीही हे काम करत असतात असेही त्यांनी सांगितले, दुभत्या जनावरांचा चारा शेतातून आणण्याचे काम तसेच जनावरे चारावयास नेण्याचे काम सामान्यपणे पुरूष व्यक्तिच करतात. आणलेला चारा जनावरांना वेळच्यावेळी घालणे, दुभती जनावरे स्वच्छ ठेवणे ,गोठा स्वच्छ ठेवणे , शेण काढणे इत्यादी कामे साधारणतः स्त्रियाच करीत असतात. स्त्रियांचे शारिरीक श्रम या दुग्धव्यवसायात मोठया प्रमाणावर आहेत असे प्रत्यक्ष निरिक्षणावरून दिसून आले.

सहकारी दूध संस्थेत दूध जमा करण्याचे काम मुख्यतः पती किंवा घरातील अन्य व्यक्तीच (८६.६७%) करतात असे दिसून येते संस्थेत दूध जमा करण्याच्या वेळा सकाळी आणि सायंकाळी ठरलेल्या असतात नेमक्या याच कालावधीत स्त्रियांना स्वयंपाकाचे काम असते यामुळे प्रत्यक्षात संस्थेत दूध जमा करणे स्त्रियांना शक्य नसते त्यातूनही ४.४४% टक्के महिला दूध संस्थेत दूध जमा करण्याचे काम स्वतः करतात. दूध व्यवसायात स्त्रियांचे शारिरीक श्रम मोठया प्रमाणावर गुंतलेले आहेत. सहकारी दूध संस्थामुळे स्त्रियांना अर्थाजनाची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामूळे समाजातील आर्थिक उत्पादन प्रकियेत स्त्रियांचा सहभाग वाढीस लागला आहे. अशा प्रकारे स्त्रियांच्या सामाजिक आणि आर्थिक सबलीकरणास सहकारी दूध संस्थामूळे चालना मिळाली आहे असे म्हणता येईल.

दूध बिलाचे पैसे कोण स्वीकारते ? या प्रश्नाला उत्तरदात्यांनी त्यांचे पती अथवा कुटुंबातील अन्य व्यक्ती असे उत्तर दिले. पण असे जरी चित्र असले तरी विभक्त कुटूंबांतील स्त्रियांना त्यांचे पती किंवा कुटूबातील व्यक्ती दूध बिलाचे पैसे आणून त्या स्त्रियांकडे देतात. त्या पैशाचा विनियोग स्त्रिया कौंटूबिक कारणासाठी आणि तसेच स्वतःला कपडे लत्ते औषध पाणी यासाठी ही खर्च करतात. विभक्त कुटूंबातीलस्त्रियांना संयुक्त कुटूंबातील स्त्रियांपेक्षा पैसे खर्च करण्याचे अधिक स्वातंत्र्य आहे. सहकारी महिला दूध संस्था स्त्रिसभासदांच्या आर्थिक सबलीकरणास चालना देत असल्याचे दिसून येते.

दूध बिलाच्या उत्पनातून कुटूबांच्या कोणत्या गरजा भागतात ? या विषयी माहिती संकलित केली त्यावरून असे दिसून आले ३/४ महिला उत्तरदात्यांच्या कुटूबांतील प्राथमिक गरजा जसे घरखर्च, बाजारहाट, या गोष्टी प्रामुख्याने दूध बिलाच्या मिळणा-या रक्कमेतून भागतात. या वरून असे दिसून येते की सहकारी दूध संस्थामूळे ग्रामीण समाजातील स्त्रियांचा विकास व स्त्रियांना आर्थिक स्त्रोत्र मिळवून देऊन स्त्रियांच्या सबलीकरणास चालना मिळत आहे.

दूध संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीच्या वेळी मतदान कोणाला करावयाचे याचा निर्णय सभासद महिला स्वतः घेतात काय ? या बाबतीत असे दिसून आले की बहुसंख्य (६२.२२% ) उत्तरदात्या महिला दूध संस्थेच्या संचालक मंडळातील

निवडणूकीत कुटूंबातील सदस्यांच्या मताप्रमाणे मतदान करतात. तर उर्वरित (३७.७८%) टक्के महिला उत्तरदात्या स्वतःच्या मताप्रमाणे संचालक मंडळाच्या निवडणूकीत मतदान करतात. केंद्र कुटूबांची पार्श्वभूमी लाभलेल्या काही स्त्रिया आज स्वतंत्रपणे स्वतःची मते निवडणूकीच्या वेळी मांडतात असे दिसून आले. सहकारी दूध संस्थेतील सहभागामुळे, केंद्र कुटूंब पध्दती व शिक्षण इत्यादी कारणामुळे आज ग्रामीण स्त्री राजकीय क्षेत्रातही पुढे येत असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचे मानसीक, राजकीय सबलीकरणास चालना मिळत असल्याचे सूचित होते.

बहुसंख्य ४३ किंवा (९३.३४% ) महिला दूध संस्थेच्या सभेला हजर असतात तर केवळ ६.६% महिला वयोमानामुळे व अशिक्षित पणामूळे दूध संस्थेच्या सभेला हजर राहत नाहीत. ज्या महिला सभेला हजर असतात त्या म्हणाल्या की सभेला हजर राहिल्यामूळे संस्थेच्या व्यवहाराबदद्‌ल माहिती मिळते तसेच इतरांचेही विचार ऐकायला मिळतात. या वरून असे सूचित होते की सहकारी दूध संस्था ग्रामीण स्त्रियांच्या सामाजिक सबलीकरणास चालना देत आहेत.

सहकारी दूध संस्थेच्या सभेत महिला स्वतःची मते मांडतात काय ?

या बदद्‌लच्या मिळालेल्या महितीवरून असे दिसून येते की , बहुसंख्य (७७.७८%) महिला उत्तरदात्या सभेमध्ये स्वतःची मते मांडतात तर उर्वरित २२.२२ टक्के महिला दूध संस्थेच्या सभेत आपली मते मांडत नाहीत. ज्या महिला आपली मते मांडतात. त्यांना आपले विचार व्यक्त करण्यासाठी सहकारी दूध संस्थेच्या माध्यमातून व्यासपीठच उपलब्ध झालेले दिसून येते यावरून असे सूचित होते की ग्रामीण स्त्रियांचा निर्णय निर्धारण प्रकियेतील सहभाग वाढत आहे. तसेच स्त्रियांच्या व्यक्तिमत्व विकास व मानसीक सबलीकरणास अशा दूध सस्थांमूळे प्रोत्साहन मिळत असल्याचे दिसून येते.

तिस–या प्रकरणातील तिस–या विभागात सहकारी दूध संस्थाचा सभासद महिलांवरील प्रभाव व कांही निरिक्षणे या बदद्रलचे विवेचन दिले आहे.

दूध संस्थेच्या सभासद महिला उत्तरदात्यांना कमावती स्त्री म्हणून तुम्हाला तुमच्या कुटूंबात मान मिळतो काय? असा प्रश्न विचारला असता नमुन्यातील सर्वच महिला उत्तर दात्यांनी स्वतः ला आपल्या कुटूंबात मान मिळतो असे सांगितले. त्यामूळे त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. यावरून सहकारी दूध संस्था ग्रामीण महिलांच्या मानसीक सबलीकरणास चालना देत आहेत असे दिसून येते.

दूध संस्थेतील सहभागामूळे तुमच्या कुटूंबाचा समाजातील दर्जा वाढला आहे असे आपणास वाटते काय ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला असता सर्वच महिला उत्तरदात्यांनी दूध संस्थेतील सहभागामूळे विशेषतः आर्थिक प्राप्ती वाढल्यामुळे समाजातील त्यांच्या कुटूंबाच्या दर्जात वाढ होत आहे असे सांगितले. या वरून असे सूचित होते की सहकारी दूध संस्थामूळे ग्रामीण विकासास चालना मिळत आहे.

दूध संस्थेतील सहभागामूळे समाजात मिळून मिसळून काम करण्याचा आत्मविश्वास आपल्यात निर्माण झाला आहे असे आपणास वाटते काय ? असा प्रश्न सभासद महिला उत्तरदात्यांना विचारला तेव्हा सर्वच महिला उत्तरदात्यांनी सहकारी दूध संस्थेतील सहभागामूळे इतर सामाजिक कार्यक्रमात व सार्वजनिक सभासमारंभात आपण सर्वांशी मिळून मिसळून काम करू शकतो असा आत्मविश्वास आपल्यात निर्माण झाला आहे असे सांगितले. या वरून असे म्हणता येईल की, सहकारी दूध संस्था ग्रामीण स्त्रियांच्या व्यक्तिमत्व विकासाला पोषक आहेत. महत्वची बाब म्हणजे सहकारी दूध संस्था समाज जीवनात स्त्रियांचा सहभाग वाढण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणा–या संस्था आहेत.

एखादी दूध संस्था आपण स्वतः चालविण्याचा आत्मविश्वास आपल्यात वाढला आहे काय ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला असता बहुसंख्य महिला उत्तर दात्यांनी स्वतः एखादी सहकारी दूध संस्था चालवू शकू असा आत्मविश्वास वाटतो असे सांगितले असे म्हणणा–या जवळ जवळ सर्वच उत्तरदात्या महिला सदर संस्थाच्या संचालक मंडळात सदस्य आहेत. या वरून निवडलेल्या दोन संस्थांमधील सुमारे १/३ महिलांमध्ये नेतृत्व गुण असल्याची जाणीव व आत्मविश्वास निर्माण झाला असल्याचे

सूचित हाते ही बाब त्यांचे सामाजिक आणि राजकीय सबलीकरण होत असल्याचे द्योतक मानता येईल.

दूध संस्थेतील महिला संभासदांनी स्थानिक पातळीवरच्या ग्रामपंचायतीच्या निवडणूका लढविल्या आहेत काय या सबंधी माहिती मिळविली असता असे दिसून आले की, उत्तरदात्या महिलांपैकी ८ महिला सदस्यांनी ग्रामपंचायतची निवडणूक लढविली आहे या सर्व ८ महिला सध्या महिला सहकारी दूधसंस्थेच्या संचालक पदावर काम करत आहेत. यातील बहुतांशी महिला मराठा जातीतील असून त्यांची शैक्षणिक, आर्थिक स्थिती उत्तम असल्याचे दिसून आले तसेच या महिलांच्या कुटूंबातील पुरूष व्यक्ती राजकीय आणि सहकारी क्षेत्रात कार्यरत असल्यामुळेही या महिलांना राजकीय क्षेत्रात काम करण्याची संधी मिळालेली आहे. पण असे असले तरी दूध संस्थेतील सहभागामुळे त्यांचे राजकीय सबलीकरण होत आहे हे महत्वाचे आहे. या वरून असे म्हणता येईल की ग्रामीण भागात सहकारी दूध संस्थामूळे महिलांना राजकीय क्षेत्रात काम करण्यास प्रात्साहन मिळत आहे त्यामुळे महिला सहकारी दूध संस्था, राजकारणातील महिलांचा प्रवेश वाढविण्यास आणि त्यांचे राजकीय सबलीकरण वाढविण्यास निश्चितच मदत करत आहेत असे संशोधिकेला दिसून आले.

आपली सहकारी महिला दूध संस्था स्थापन करण्यासाठी कोणी पुढाकार घेतला ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला असता सर्वच महिला उत्तरदात्यांनी पुरूषांनी पुढाकार घेतला असे सांगितले. आपल्या दूध संस्थेच्या कामकाजात पुरूष व्यक्तीचा सहभाग कितपत आहे. असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला असता पुरूषांचा सहभाग दूध संस्थेच्या कामकाजात मोठया प्रमाणावर असल्याचे सर्वच महिला उत्तरदात्यांनी सांगितले.

आपल्या दूध संस्थेच्या कामकाजात आपल्या कुटूंबातील पुरूष व्यक्तीची मदत आवश्यक आहे असे आपल्याला वाटते काय ? या प्रश्नाला सर्व महिला उत्तरदात्यांनी मदत आवशक आहे. असे स्पष्टपणे सांगितले. या गोष्टींचे समर्थन करताना त्या म्हणाल्या की आम्हांला आमची घरची कामे संपत नसल्या कारणाने , चूल व मूल या पारंपारिक

समाजरिती बंधनात अडकून पडलेल्या आम्हा स्त्रियांनाा सहकारी क्षेत्रात घराबाहेर पडून पूर्ण वेळ व स्वतःच्या जबाबदारीवर संस्थेचे कामकाज निभावता येत नसल्याकारणाने पुरूष व्यक्तींच्या मदतीशिवाय असे व्यवहार पूर्ण होऊ शकणार नाहीत. त्यामुळे सदरच्या महिला संस्था जरी महिलांसाठी स्थापन केल्या असल्या तरी संस्थेचे व्यवहार मात्र पुरूष व्यक्तीच मोठया प्रमाणावर पहात आहेत असे प्रत्यक्ष निरिक्षणावरून व अनौपचारिक चर्चेवरून दिसून आले.

प्रस्तुत अभ्यासाबाबत सारांश रूपाने असे म्हणता येईल की सहकारी दूध संस्थामूळे

१) ग्रामीण महिलांना उत्पादक आर्थिक कार्यात सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली आहे.

२) कुटूंबाबाहेरील औपचारिक संघटनेचे ( दूध संस्था) सभासद होण्याची संधी मिळाली आहे.

३) अर्थार्जनाची संधी उपलब्ध झाली आहे.

४) मर्यादित प्रमाणात का होईना पण स्वतः पैसे खर्च करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे.

५) सभेसारख्या औपचारिक प्रक्रियेत सहभागी होण्याची व तेथे आपली मते व्यक्त करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

६) काही स्त्रियांना नेतृत्व पदे मिळाली आहेत.

७) काही स्त्रियांना ग्रामपंचायतीसारख्या निवडणूकीत उभे रहण्याची संधी मिळाली आहे.

८) स्त्रियांमध्ये स्वतःच्या कुटूंबातील स्वतःचा दर्जा तसेच त्यांच्या कुटूंबाचा समाजातील दर्जा वाढल्याची जाणीव झाली आहे.

९) काही स्त्रियांमध्ये स्वतः च दूध संस्था चालविण्याचा आत्मविश्वास निर्माण होत आहे.

१०) स्त्रियांमध्ये कुटूंबाबाहेरिल समाजजीवनात सहभागी होण्याबाबतचा आत्मविश्वास निर्माण होत आहे.

या वरून महिलांच्या सहकारी दूध संस्था ग्रामीण स्त्रियांच्या मानसीक, सामाजिक आर्थिक आणि राजकीय सबलीकरणास चालना देणा–या संस्था आहेत असा सर्वसाधारण निष्कर्ष काढता येईल.